# आदिवार्ता

## आदिवासी विकास आयुक्तालय




आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहितार्थ
महाराष्ट्र शासन

## -: प्रेरणास्थान :-

**मा. ना. डॉ. अशोक वुईके**
(मंत्री, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)

**मा. ना. श्री. इंद्रनील नाईक**
(राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)

## -: संकल्पना :-

**मा. श्री. विजय वाघमारे**
(सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)

## -: मार्गदर्शक :-

**लीना बनसोड**
आयुक्त

**कपील पवार**
सहसंचालक (लेखा व कोषागारे)

**भगवान जगदाळे**
सहआयुक्त (नियोजन)

**दिनकर पावरा**
अपर आयुक्त (मुख्यालय )

**संतोष ठुबे**
उपायुक्त

**विनिता सोनवणे**
उपायुक्त

**शशिकला अहिरराव**
उपायुक्त

**दिलीप खोकले**
सहायक आयुक्त

### -: विशेष सहकार्य :-

आदिवासी विकास आयुक्तालय, अपर आयुक्त कार्यालय (नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर), सर्व प्रकल्प अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद.


### -: प्रकाशन व मुद्रणहक्क :-

**आयुक्त,**
आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक



### -:माहिती संकलन, संपादन आणि मांडणी:-

**नितीन रणशूर**
जनसंपर्क अधिकारी,
आदिवासी विकास आयुक्तालय
संपर्क : ७६२०००६८३१
Tribal Dev. Commissioner



विनामूल्य वितरणासाठी
मे-जून : २०२५


## अंतरंग

- हितगुज
- आश्रमशाळा शिक्षणाला नवे पंख!
- नवीन शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा
- नवतंत्रज्ञानाचा ध्यास.. ‘आयआयटी’त अभ्यास
- आदिवासी महिलांचा सक्षम प्रवास
- २४० आश्रमशाळांचा १०० % निकाल
- समर कॅम्पमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास
- शासकीय वसतिगृह डीबीटीमध्ये वाढ
- सीबीएसई निकालात ‘एकलव्य’चे यश
- विद्यार्थ्यांनी धावत्या मेट्रोमध्ये साकारली रांगोळी

मुखपृष्ठ : आयआयटी मुंबईच्या 'वाईएसई' या निवासी उपक्रमात महाराष्ट्रातील ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलच्या ८४ जणांचा चमू सहभागी झाला होता. यावेळी विद्यार्थिनीनी बनविलेले सर्किट.

# नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल

नवीन शैक्षणिक वर्षाची चाहूल लागली की, शिक्षण क्षेत्रात एक वेगळीच ऊर्जा संचारते. विद्यार्थ्यांचे स्वागतासाठी संपूर्ण शाळा व्यवस्था सज्ज होते. आपल्या आश्रमशाळा ही केवळ शिक्षणाची केंद्रे नसून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी संस्कारशाळा आहेत. त्या दृष्टीने शिक्षकांनी नव्या अध्यापन पद्धतींसह सज्ज होण्याची तर अधिकारी वर्गानेही आश्रमशाळांच्या प्रत्येक व्यवस्थेचा बारकाईने आढावा घेण्याची आवश्यकता आहे.



विद्यार्थ्यांसाठी शाळेचा पहिला दिवस केवळ एक तारीख नसते. तर तो असतो नव्या उमेदांचा, नव्या संकल्पांचा आणि नव्या सुरुवातींचा दिवस. आणि याच सुरुवातीला यशस्वी बनवण्याची जबाबदारी अधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते. या संपूर्ण प्रक्रियेत अधिकारी, शिक्षक, कर्मचारी हे केवळ काम करणारे नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार असतात. त्यांच्या सज्जतेमुळेच शाळेचा पहिला दिवस उत्साहाने भरलेला असतो, आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर नव्या उमेदेचा प्रकाश देणारा असतो. यंदाही विद्यार्थी-शिक्षक यांच्यात विश्वासाचे नाते तयार होण्यासाठी संवादाचे विविध कार्यक्रम राबवले जाणार आहे.

अधिकारी, शिक्षक आणि कर्मचारी यांच्या एकत्रित, सजग आणि संवेदनशील अशा यंत्रणेच्या बळावरच आदिवासी भागांतील शैक्षणिक परिवर्तन शक्य होत आहे. ते शिक्षण ही केवळ आश्रमशाळेची जबाबदारी नाही तर ती प्रशासन, पालक, आणि समाजाची सामूहिक जबाबदारी म्हणून स्वीकारतात. या नवीन शैक्षणिक वर्षात आदिवासी विकास विभाग फक्त अभ्यासावर भर देणार नाही, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, तंत्रज्ञानाची ओळख, कला, खेळ, व्यक्तिमत्त्व विकास आणि मूल्यशिक्षण या प्रत्येक क्षेत्रात लक्ष घालणार आहोत. शाळेतील वातावरण अधिक प्रेरणादायी बनविण्यावर लक्ष असणार आहे.

**-लीना बनसोड,** आयुक्त

# एज्युकेशन सॉफ्टवेअरने

# आश्रमशाळा शिक्षणाला नवे पंख!



दृकश्राव्य एज्युकेशन सॉफ्टवेअरमुळे अध्यापन व अध्ययन अधिक सुलभ, प्रेरक आणि प्रभावी होते. हीच बाब लक्षात घेऊन धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या २० शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत कल्याण ईस्ट होम रिवाईज यांच्याकडून दृकश्राव्य एज्युकेशन सॉफ्टवेअर तयार केले. या सॉफ्टवेअरच्या वापरामुळे शिक्षकांसाठी अध्यापन सुलभ आणि विद्यार्थ्यांसाठी अध्ययन सोपे व आकर्षक झाले आहे. मल्टीमीडिया सामग्रीने शिक्षकांच्या वेळेत बचत होऊन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.

एज्युकेशन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून दृकश्राव्य साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजून सांगण्यास मदत झाली. यामुळे विद्यार्थी अधिक लक्षपूर्वक शिकायला लागले आणि त्यांच्या ज्ञानात अधिक चांगल्या प्रकारे भर पडून त्याच्या लक्षात राहण्यास मदत होऊ लागली आहे. शिक्षकांनी अध्यापन पद्धतीत दृकश्राव्य साधनांतील एज्युकेशन सॉफ्टवेअरचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनविले आहे. दृकश्राव्य साधनांमुळे विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रिया अधिक मजेदार आणि आकर्षण वाटू लागली. एज्युकेशन सॉफ्टवेअरच्या दृकश्राव्य साधनांमुळे विद्यार्थी अधिक उत्साही होऊन शिकतात आणि त्यांना शिक्षण अधिक आनंददायी वाटू शकते हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे सॉफ्टवेअर प्रणाली प्रत्येक धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अधिनस्त आश्रमशाळेमध्ये विकसित करण्यात आली आहे.

शिक्षक आपल्या अध्यापनात परिणामकारक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया राबविण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करू शकले आहे. दृकश्राव्य साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना विविध विषयांवर अधिक चांगली माहिती देता येत आहे. अध्यापनात प्रत्यक्ष अनुभव देणे शक्य नसते त्यावेळी दृक साधने अत्यंत उपयुक्त ठरत आहे. अध्यापन करत असताना प्रत्येक वेळी प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी छोट्या छोट्या गोष्टींसाठी वर्गाबाहेर जाणे शक्य नसते. त्यावेळी दृक साधने उपयुक्त ठरतात. शाब्दिक वर्णनांबरोबरच जर फळा, नकाशे, चित्रे, वस्तू, नमुने, आकृती, प्रतिकृती यांचा वापर करून अध्ययन केले तर ते विद्यार्थ्यांना योग्य लक्षात ठेवण्यास मदत होते. त्याचा अंतर्भाव या एज्युकेशन सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आला आहे.










विद्यार्थ्यांसमोर योग्य अध्यापनातील प्रतिमा उभ्या राहिल्यात आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. विचार प्रक्रियेला आणि चौकस बुद्धीला चालना मिळाली. बारकाईने निरीक्षण करणे, निरीक्षणाच्या नोंदी घेणे, त्यावरून निष्कर्ष काढणे आदीचा विकास या एज्युकेशन सॉफ्टवेअरच्या दृकश्राव्य प्रणालीमुळे झालेला दिसून आला. शास्त्रीय दृष्टिकोन व छंद निर्माण करण्यात मदत झाली. दरम्यान, एज्युकेशन सॉफ्टवेअरच्या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ होऊन विद्यार्थ्यांचे दहावी आणि बारावीचे शाळांचे निकाल उंचावण्यामध्ये मदत झालेली आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर व सहायक प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती

स्थळ आणि काळाच्या मर्यादेमुळे प्रत्येक बाबतीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देणे शक्य नसतानाही त्यावेळी प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळते. एज्युकेशन सॉफ्टवेअरचा अत्यंत परिणामकारक उपयोग आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये झालेला आहे. तसेच कमी वेळेत जास्तीत जास्त योग्य ज्ञानदान विद्यार्थ्यांना देता आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची, जिज्ञासा निर्माण करता येणे शक्य झाले. अध्यापनसाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या विद्यार्थी तयार झाले. या साधनांमुळे ज्ञानग्रहण क्रिया जलद होऊन ज्ञान टिकाऊ स्वरूपी व कायमस्वरूपी बनले.

## प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र वेळापत्रक

एज्युकेशन सॉफ्टवेअर हे स्मार्ट इंटरॅक्टिव बोर्ड एकच असल्याने एकाच ठिकाणी इन्स्टॉल करण्यात आले होते. त्यामुळे पूर्णवेळ प्रत्येक वर्गासाठी दृकसाव्य साधनाच्या माध्यमातून एज्युकेशन सॉफ्टवेअर प्रणालीतून अध्ययन अध्यापन प्रक्रिया राबवणे अशक्य होते. त्यापार्श्वभूमीवर प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र वेळापत्रक तयार करण्यात आले होते. या वेळापत्रकाच्या माध्यमातून दररोज इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना एज्युकेशन सॉफ्टवेअर प्रणालीच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया राबविण्यात आली. --




# आश्रमशाळा नवीन शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा

इगतपुरी तालुक्यातील शासकीय इंग्रजी माध्यम निवासी आश्रमशाळा मुंढेगांव येथे विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशोत्सवासह आयोजित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक वुईके व मान्यवरांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव प्रसंगी नवोगत विद्यार्थ्यांचे फुल देवून स्वागत करण्यात आले. प्रवेशित विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांसोबत आदिवासी विकास मंत्री वुईके यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

आश्रमशाळा प्रवेशोत्सवासाठी अन्न व औषध प्रशासन,विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार हिरमण खोसकर, आदिवासी विकास आयुक्त तथा, शबरी वित्त व आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त (मुख्यालय) दिनकर पावरा, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,नाशिक अर्पित चौहान, तहसीलदार अभिजीत बारवकर सार्वजनिक बांधकाम (आदिवासी विभाग) नाशिकचे कार्यकारी अभियंता निरज चोरे, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग प्रदिप दळवी यांच्यासह अधिकारी, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यात एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळा आणि ५५४ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक व दर्जेदार शिक्षणासाठी आदिवासी विभाग सदैव कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांनी केले. तर अन्न व औषध प्रशासन,विशेष सहाय्य मंत्री झिरवाळ मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, आज गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबाबत







त्यांचा गौरव करतांना मनस्वी आनंद होत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून निश्चितच इतर मुलांना प्रोत्साहन मिळणार आहे. आदिवासी जमाती आयोगास संविधानात्मक दर्जा प्राप्त झाल्याने शासनाचा आभार व्यक्त करीत मंत्री झिरवाळ यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विविध दाखल्यांचे वाटप

जनजातीय कार्य मंत्रालय भारत सरकार आणि आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या सौजन्याने १५ जून ते ३० जून २०२५ पर्यंत धरती आबा जनभागीदारी अभियान राबविण्यात येत आहे. या अतंर्गत सर्व अनुसूचित जमातीना शासकीय कामकाजासाठी लागणारे आवश्यक दस्तावेज मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यात आधार कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, जातीचे दाखले, रहिवास दाखले, रेशन कार्ड, बँक खाते, किसान क्रेडीट, ईपीक कार्ड, सिकल सेल तपासणी, पी.एम.आवास योजना, उज्वला गॅस योजना, वीज जोडणी, जॉब कार्ड यांचा समावेश आहे. मेडीकल मोबाईल रूग्णवाहिकांद्वारे आदिवासी वाडी-वस्तीवर जाऊन रूग्णांची मोफत तपासणी व उपचार केले जाणार आहेत. जास्तीत जास्त आदिवासी बांधवांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आदिवासी विकास आयुक्त बनसोड यांनी केले.

## विद्यार्थ्यांसोबत ऑनलाईन संवाद

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प नाशिक व सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी) विभाग, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय इंग्रजी माध्यमाची आश्रमशाळा मुंडेगाव ता.इगतपुरी या आश्रमशाळेचे आदर्श शाळेत रूपांतर करणे व डिजीटल क्लासरूम व टॅब लॅबचे उद्घाटन मंत्री श्री. वुईके यांच्या हस्ते झाले. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुका येथील धरती आबा जनजातीय ग्रामउत्कर्ष अभियान योजनेच्या राज्यस्तरीय प्रचार व प्रसिद्धी शुभारंभ कार्यक्रमात मंत्री श्री. वुईके यांनी दृकश्राव्य माध्यमातून सहभाग नोंदवित ऑनलाईन संवाद साधला.

## राघोजी भांगरे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

यावेळी आश्रमशाळांमधील इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी कला व विज्ञान परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना रूपये दहा हजार, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना रूपये सात हजार व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रूपये पाच हजार रकमेच्या धनादेश व सन्मान पत्राचे प्रदान मंत्री श्री. वुईके आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नवनियुक्त परिचारिका यांना आरोग्य किट वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

--

# नवतंत्रज्ञानाचा ध्यास.. ‘आयआयटी’त अभ्यास



## ‘वाईएसई’ उपक्रम: एकलव्य स्कूलच्या विद्यार्थिनींचा सहभाग

आयआयटी मुंबईकडून ग्रामीण आणि आदिवासी भागातील नववीतील मुलींना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी 'वाईएसई' अर्थात वुमेन्स इन सायन्स अँड इंजिनिअरींग हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत नवतंत्रज्ञानाचा ध्यास असलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलच्या ७४ विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवत अभ्यास केला. त्यामुळे या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली असून, त्यांच्यामध्ये तंत्रज्ञानाची गोडी निर्माण झाली.

आयआयटी मुंबईच्या 'वाईएसई' या निवासी उपक्रमात महाराष्ट्रातील ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलच्या ८४ जणांचा चमू सहभागी झाला. यात प्रत्येक स्कूलच्या २ याप्रमाणे इयत्ता दहावीच्या ७४ विद्यार्थिनी, ८ शिक्षिका (विज्ञान आणि गणित विषय) तसेच २ प्राचार्यांची निवड करण्यात आली. या चमूला आयआयटी मुंबईच्या होस्टेलमध्ये ५ दिवस राहण्याची संधी मिळाल्याने कॅम्पस जीवनाचा अनुभव घेता आला.



'वाईएसई' उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचा उपक्रम असल्याने दररोज सकाळी महिला वक्त्यांच्या प्रेरणादायी संवाद सत्र आयोजित करण्यात आले होते. ज्यात विविध क्षेत्रातील महिलांनी त्यांच्या प्रेरणादायी अनुभव कथन केले. दुपारच्या सत्रात मुलींनी स्टेम संबंधित प्रात्यक्षिक सत्रांमध्ये भाग घेतला. त्यांनी लाइट बल्ब सर्किट्स, बल्ब, रोबोट, ड्रोन यासारख्या इलेक्ट्रिकल-इलेक्ट्रॉनिक साहित्य बनविण्याचे प्रात्याक्षिके केले.

## संपूर्ण खर्च आयआयटी मुंबईचा


'वाईएसई' उपक्रमात सहभागी विद्यार्थिनींच्या निवास, भोजन आणि प्रवासाचा संपूर्ण खर्च आयआयटी मुंबईने केला आहे. तसेच प्रात्याक्षिकांसाठी आवश्यक साहित्यही आयआयटी मुंबईकडून उपलब्ध करून देण्यात आले होते. विद्यार्थिनींनी बनविलेले साहित्य संबधित शाळांना दिले जाणार आहे.



'वाईएसई' उपक्रमाने आदिवासी भागातील मुलींना प्रत्येक दिवशी विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांशी संवाद साधता आला. त्यामुळे मुलीना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यांना त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन मिळाले आहे. त्याचा फायदा विद्यार्थिनींना निश्चितच होईल.

-लीना बनसोड, आयुक्त,
आदिवासी विकास विभाग









# आदिवासी महिलांचा सक्षम प्रवास



यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात जिजामाता वनधन विकास केंद्र आदिवासी समुदायासाठी आशेचा किरण बनले आहे. पंतप्रधान जनमन उपक्रमांतर्गत सुरू झालेले हे केंद्र आदिवासी महिलांना शाश्वत उपजीविका आणि उद्योजकतेची संधी देत आहे. सन २०२४ मध्ये केंद्र सुरू होण्यापूर्वी, येथील आदिवासी महिला बचत गटांमार्फत फक्त छोटी बचत आणि कर्ज उपक्रम करत होत्या. बहुतेक जण शेती किंवा मजुरीवर अवलंबून होते. उन्हाळ्यात उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांना स्थलांतर करावे लागत असे. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी ग्रामीन समस्या मुक्ती ट्रस्ट आणि दिशा फेडरेशनने जागरूकता वाढवली आणि बदलाचा पाया रचला.

सन २०२४ मध्ये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिकच्या सहकार्याने जिजामाता वन धन विकास केंद्र सुरू झाले. याचा उद्देश लघु वनोपज गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे, मूल्यवर्धन, साठवणूक आणि विक्री करणे हा होता. सुरुवातीला फक्त दोनच बचत गट सहभागी झाले. पण प्रशिक्षण आणि यशामुळे इतर गटही सामील झाले. महिलांना वन-आधारित व्यवसायाची ताकद समजू लागली. महिलांना उद्योजकता जागरूकता कार्यक्रम, उद्योजकता विकास कार्यक्रम आणि कौशल्य विकास कार्यक्रम यासारख्या प्रशिक्षणांत सहभागी केले गेले. यामुळे त्यांना व्यवसाय आणि उत्पादनाचे ज्ञान मिळाले. सरकारी योजना आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने केंद्राची पायाभूत सुविधा सुधारली.



आज जिजामाता वनधन विकास केंद्र ५६ लाभार्थ्यांसह कार्यरत आहे, ज्यात कोलाम समाजातील महिलांचा समावेश आहे. येथे रानातील मध, शेणाच्या धूपबत्त्या, गोवऱ्या, द्रोण-पत्रावळ आणि प्रक्रिया केलेला डिंक तयार होतो. ‘शबरी नॅचरल्स’ या आदिवासी बांधवांच्या प्रीमियम उत्पादनांच्या ब्रँडमुळे केंद्राला मोठ्या प्रमाणात ऑर्डर मिळाल्या आणि यामुळे महिलांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन झाले. या ब्रँड अंतर्गत १.५ लाख रुपयांच्या ऑर्डर पूर्ण केल्या. १५ क्विंटल डिंक विकून ४.५ लाख रुपये मिळवले, जे सदस्यांमध्ये वितरित झाले. ट्रायब्स इंडिया आणि ONDC सोबत करार, तसेच प्रदर्शनांमुळे दृश्यमानता वाढली. केंद्राची स्वप्ने मोठी आहेत. प्रगत प्रक्रिया युनिट्स, पॅकेजिंग आणि छपाई यंत्रे, कच्चा माल खरेदी प्रणालीत सुधारणा आणि ब्रँडिंग व विपणन विस्तार हे त्यांचे ध्येय आहे.

जिजामाता वन धन विकास केंद्राने आदिवासी महिलांना स्थलांतरितांपासून आत्मविश्वासू उद्योजकांपर्यंत नेले आहे. शबरी महामंडळ, TRIFED आणि स्थानिक संस्थांच्या पाठबळाने हे केंद्र महाराष्ट्रातील आदिवासी समुदायांसाठी शाश्वत भविष्याची प्रेरणा बनले आहे.

## आदिवासी विकास मंत्र्यांकडून सन्मान

यवतमाळ येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते जिजामाता वनधन विकास केंद्राचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--











# १३६ शासकीय तर, १०४ अनुदानित आश्रमशाळांचा १०० % निकाल

## इयत्ता बारावीच्या परीक्षेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी- २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला. या निकालात आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. राज्यातील तब्बल १३६ शासकीय आश्रमशाळांचा तर १०४ अनुदानित आश्रमशाळांचा १०० टक्के निकाल लागला आहे.

आदिवासी विकास विभागाकडून ४९७ शासकीय तर ५५४ अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. दुर्गम आदिवासी भागातील मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आश्रमशाळा हा एक प्रभावी पर्याय ठरतो आहे. या आश्रमशाळांच्या गुणवत्तावाढीसाठी विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात. परिणामी, यंदाच्या इयत्ता बारावीचा निकालात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी बाजी मारल्याचे चित्र आहे.

राज्यातील शासकीय आश्रमशाळांचा एकूण निकाल ९४.१५ टक्के इतका लागला. १३६ आश्रमशाळांचा निकाल शंभर टक्के आहे. त्यात कला शाखेच्या (५७) तर विज्ञान शाखेच्या (७९) आश्रमशाळांचा समावेश आहे. अनुदानित आश्रमशाळांचा निकाल ९२.४६ टक्के घोषित झाला आहे. १०४ आश्रमशाळांचा निकाल शंभर टक्के आहे. त्यात कला शाखेच्या (४७) तर विज्ञान शाखेच्या (५७) आश्रमशाळा आहे.

दरम्यान, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागाचे सचिव विजय वाघमारे, आयुक्त लीना बनसोड यांनी विभागातील अधिकारी, मुख्याध्यपक, शिक्षक, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरावरील यशवंत विद्यार्थी

## शासकीय आश्रमशाळा

- **कला शाखा :**

मुली : प्रथम- नंदिनी मुठे (सोमतवाडी)- ८७.३३%, द्वितीय- कविता पालवी (दहिंदुले)- ८६%, तृतीय- सुरेखा ठाकरे (दहिंदुले)- ८४.३३%, चतुर्थ- अंजली कामडी (वरवडा)- ८३.५०%, पंचम- धनश्री ठाकरे (चणकापूर)- ८२.५०%

मुले : प्रथम- विजय लोभी (सानेगाव)- ८१.६७%, द्वितीय- प्रकाश मेंगाळ (वरसई) व अल्केश कास्देकर (जारिंदा)- ८१.१७%, तृतीय- रामप्रसाद जामुनकर (डोमा)- ७९.५०%, चतुर्थ- अमोल गायकवाड (चणकापूर)- ७९.१७%, पंचम- महेश चव्हाण (बोरीपाडा)- ७८.१७%

- **विज्ञान शाखा :**

मुली : प्रथम- श्रुती मरकाम (पुराडा)- ८३.३३%, द्वितीय- गायत्री गवळी (दहिंदुले)- ८२.१७%, तृतीय- तृप्ती कोरडे (देवगाव)- ८१.८३%, चतुर्थ- निशा गवळी (माणी)- ८१.६७%, पंचम- योगिता गांगुर्डे (दहिंदुले)- ८१.५०%

मुले: प्रथम- स्वराज पाटील(ननाशी)- ८१.८३%, द्वितीय- सुजल वळवी (लोय)- ७९.५०%, तृतीय- वैभव बागुल (दहिंदुले) व कल्पेश चौरे (रोहोड)- ७७.८३%, चतुर्थ- रविंद्र अहिरे (रोहोड) व सचिन कास्देकर (जारिंदा)- ७७.३३%, पंचम- जगदीश खांडवी व राहुल गवळी- ७७%

## अनुदानित आश्रमशाळा

- **कला शाखा**

मुली : प्रथम- प्रिती बहात्रे (वाघेरा)- ८५%, द्वितीय- यमुना महाले (वाघेरा)- ८४.५०%, तृतीय- प्रिया सहारे (वाघेरा)-८३%, चतुर्थ- संचिता भांगरे (वाघेरा)- ८२.५०%, मयुरी मौळे (तिल्लोळी)- ८२.१७%

मुले : प्रथम- सुरज चोंडकर (किन्ही नाईक)- ८४.५०%, द्वितीय- मिंटू जावरकर (नांदगाव पेठ)- ८३.३३%, तृतीय- गारशीलाल पावरा (शिरपूर)-८२.८३%, चतुर्थ- सावन पावरा- (वाघाडी)- ८२%, पंचम- विक्रम भोळे (मुलवड)- ८१.६७%

- **विज्ञान शाखा :**

मुली : प्रथम- अस्मिता गांगुर्डे (अलंगुण)- ८९%, द्वितीय- कविता पावरा (शिरपूर)- ८६.३३%, तृतीय- भाग्यश्री भोईदास पावरा (निमझरी)- ८५.६६%, चतुर्थ- प्रीती पावरा (शिरपूर)- ८५.१६%, पंचम- भाग्यश्री सुभाष पावरा व तेजश्री पावरा (निमझरी)- ८३.५%

मुले : प्रथम- सुमन वसावे (कोळदे)- ८५.८३%, द्वितीय- वेदांत कास्देकर (भोकरबर्डी), चेतन पवार (लाडूद) व पवन मोरे (कोळदे)- ८२.५%, तृतीय- अविनाश पावरा (वाघाडी) व मंगेश पावरा (शिरपूर)- ८१.८३%, चतुर्थ- गोपीचंद पावरा व सुमित दुमारे- ८१.५%. --





# समर कॅम्पमुळे आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

देवरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून सुट्ट्यांचा सदुपयोग करत शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील दुर्गम-अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात या समर कॅम्पने महत्त्वपूर्ण भूमिका बजाविली आहे. कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि शारीरिक विकासाला चालना देण्यात आली. विद्यार्थ्यांना तायक्वांडो, आर्चरी, योगा, इंग्रजी संभाषण, ढोल वादन, गोंडी नृत्य इत्यादींचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे उन्हाळी शिबिरे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी माध्यम ठरले आहे. या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक आणि शारीरिक क्षमतांचा विकास होऊन त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम सज्ज केले.

समर कॅम्पमधून आश्रमशाळेतील मुलांना विविध कला-गुणांचे ज्ञान, विद्यार्थ्यांची उन्हाळी सुट्टी खऱ्या अर्थाने सार्थकी, विद्यार्थ्यांना मिळत, त्यांना विविध कला गुणांचे ज्ञानदान करण्यात आले. महिनाभराच्या कॅम्पचे उद्घाटन आमदार संजय पुराम यांच्या हस्ते पार पडले.जीवनात ध्येय ठेवा, ध्येय असेल तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता असे त्यांनी उदाहरणासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी नगराध्यक्ष संजय उईके, अनिल बिसेन (सभापती, पंचायत समिती देवरी), महेंद्र गणवीर (तहसीलदार), अंबिका बंजार, प्रल्हाद सलामे, उमेश काशीद (प्रकल्प अधिकारी), डॉ. सायली चिखलीकर, शिरीष सोनेवाने, सुनील

भुसारी आदी उपस्थित होते.

समर कॅम्प ऍक्टिव्हिटीमध्ये ॲथलेटिक्स ४४, संगीत २१, क्ले आर्ट १४, रांगोळी १५, मेहंदी १६, गोंडी पेंटिंग २१, बांबू आर्ट १८ अशा सुमारे १४९ विद्यार्थ्यांनी विषयनिहाय कौशल्य प्राप्त केले. याव्यतिरिक्त सकाळी योगा तर सायंकाळी आर्चरी तसेच नाशिक ढोलचे प्रशिक्षण सुद्धा या विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ प्रशिक्षकांची मुलाखतीद्वारे निवड केली.

कॅम्पमधील विद्यार्थ्यांची निवड त्या त्या विषयातील तज्ञ व्यक्तींनी प्रत्यक्ष आश्रमशाळेवर जाऊन मुलांची आवड आणि कलेविषयी ज्ञान या आधारे करण्यात आली होती. कॅम्पमधील विद्यार्थ्यांना कलेतून प्रविण्य कसे प्राप्त होईल आणि करिअरच्या संधी कश्या निर्माण होतील असे प्रयत्न करण्यात आला. बांबू संशोधन केंद्र चंद्रपूर यांचेही विद्यार्थ्यांना बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यामध्ये मार्गदर्शन लाभले.









# वसतिगृह डीबीटीमध्ये वाढ

## आहार, निर्वाह व शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्याचा समावेश

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे यासाठी राज्यभरात विभागीय, जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या निर्वाह व आहार भत्त्यांमध्ये सुमारे दुपटीने वाढ करण्यात आली असून शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यातही वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यात ४९० वसतिगृह सुरू असून त्यापैकी २८४ मुलांची व २०६ मुलींची वसतिगृहे आहेत. यामध्ये एकूण ५८ हजार ७०० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

महागाई निर्देशांकाचा विचार करून या भत्त्यांच्या दरात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेषतः वसतिगृहात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना गेल्या काही वर्षांत कोणतीही वाढ न मिळाल्याने अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे आता सुधारित दरानुसार अधिक आर्थिक सहाय्य मिळणार आहे. दरम्यान, आहार, निर्वाह व शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयाने हजारो विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुकर होणार असून त्यांना नवचैतन्य मिळणार आहे.

--

### असे असणार नवीन सुधारित दर (सध्याचा भत्ता) :

- निर्वाह भत्ता (दरमहा) : विभागीय स्तरासाठी १४०० रूपये (८००), जिल्हा स्तरासाठी १३०० रूपये (६००) आणि ग्रामीण/तालुका स्तरासाठी १००० रूपये (५००) इतका भत्ता देण्यात येणार आहे. मुलींना मिळणारा अतिरिक्त निर्वाह भत्ताही १०० रुपयांवरून १५० रूपये इतका वाढविण्यात आला आहे.
- शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता (वार्षिक) : इयत्ता ८ वी ते १० वीसाठी ४५०० रूपये (३२००), ११ वी, १२ वी व पदविका अभ्यासक्रमासाठी ५००० रूपये (४०००), पदवी अभ्यासक्रमासाठी ५७०० रूपये (४५००) तर वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी ८००० रूपये (६०००) एवढा भत्ता मंजूर झाला आहे.
- आहार भत्ता (दर महिना) : महानगरपालिका व विभागीय शहरांतील वसतिगृहासाठी ५००० रूपये (३५००) आणि जिल्हा स्तरावरील वसतिगृहांसाठी ४५०० रूपये (३००) इतका भत्ता निश्चित करण्यात आला आहे.

# सीबीएसई परीक्षा निकालात ‘एकलव्य’चे विद्यार्थी चमकले

## इयत्ता बारावीच्या ८ तर दहावीच्या ५ स्कूलचा १०० टक्के निकाल

केंद्रीय माध्यामिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई बोर्डाने नुकताच इयत्ता दहावी व बारावी लेखी परिक्षेच निकाल जाहिर केला. या निकालात एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलचे विद्यार्थी चमकले आहे. यंदा एकलव्य स्कूलचा इयत्ता दहावी निकाल ८७.९१ टक्के तर बारावीचा विज्ञान शाखेचा निकाल ९०.८६ टक्के आणि वाणिज्य शाखेचा निकाल ६६.६७ टक्के इतका लागला आहे. इयत्ता दहावीच्या ५ तर बारावीच्या ८ स्कूलमधील १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळांच्या सीबीएसई बोर्डाचे शिक्षण मिळण्यासाठी महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटीच्या (नाशिक) माध्यमातून राज्यात ३७ एकलव्य रेसिडेन्सियल मॉडेल स्कूल चालविल्या जातात. त्यात १५ स्कूलमध्ये इयत्ता बारावीपर्यंत तर २५ स्कूलमध्ये दहावीपर्यंत विद्यार्थी धडे गिरवितात.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी २५ एकलव्य स्कूलच्या १,३२४ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी १,१६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षेसाठी १५ एकलव्य शाळेतील विज्ञान शाखेचे ५६९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ५१७ विद्यार्थी पास झाले आहेत. वाणिज्य शाखेतून १५ विद्यार्थ्यांनी लेखी दिली होती. त्यात १० विद्यार्थ्यांना यश मिळवत शाळेचे नावलौकिक वाढविले.

राज्यात इयत्ता बारावीच्या विज्ञान शाखेतून मुलींमध्ये पूजा जाधव हिने ८८.८ टक्के गुणांसह तर मुलांमधून गणेश पारधी याने ८५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकविला. वाणिज्य शाखेत मुलांमध्ये रितेश भांबरे (७५.४%) याला तर मुलींमध्ये दुर्गा महाले (६७.२%) हिला प्रथम क्रमांक मिळाला. इयत्ता दहावीत मुलींमध्ये योगिनी पाडवी ८६.६ टक्के गुणांसह तर मुलांमध्ये आकाश निमाला ८८.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. दरम्यान, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागाचे सचिव विजय वाघमारे, आयुक्त लीना बनसोड यांनी प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

**या शाळांचा १०० टक्के निकाल**

**इयत्ता दहावी :** मवेशी, बोरगाव बाजार, चणकापूर, शिंदे दिगार, सवणे.

**इयत्ता बारावी :** नंदुरबार, मवेशी, अजमेर सौंदाणे, चिखलदरा, बोरगाव बाजार, खैरीपरसोडा, सहस्रकुंड, शेंडेगाव.

--

## विद्यार्थ्यांनी धावत्या मेट्रोमध्ये साकारली

# क्लेद्वारे भगवान बिरसा मुंडा यांची प्रतिकृती, अन् राष्ट्रपतीची रांगोळी



देवरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक व शारीरिक विकास उन्हाळी शिबिराचे बोरगाव येथील आश्रमशाळेत करण्यात आलेले आहे. अभ्यास दौऱ्याअंतर्गत नागपूर मेट्रो सफर आयोजन करण्यात आली होती. मुलांनी समर कॅम्पमध्ये शिकलेल्या कलांचे दर्शन नागपूर मेट्रोमध्ये घडविले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे धावत्या मेट्रोमध्ये रांगोळीद्वारे रेखाचित्र रेखाटले. तसेच क्लेद्वारे भगवान बिरसा मुंडा यांची कलाकृती साकारली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पहिल्यांदा मेट्रोमध्ये बसल्याचा आनंद होता.









धावत्या मेट्रोमध्ये मुलांनी कलाकृतीचे दर्शन घडवले. त्यामुळे आदिवासी समुदायातील मुलेही विविधअंगी बाबी आश्रमशाळेतून शिकत असल्याचे निदर्शनास येत आहे. आदिवासी समुदायातील पालकांनी मुलांना आपल्या आश्रमशाळेत प्रवेश घेण्याची गरज आहे.

-उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी

मेट्रो प्रवासात नागपूरच्या अपर आयुक्त आयुषी सिंग, उपायुक्त दिगांबर चव्हाण, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद, नितीन इसोकर, सहाय्यक प्रकल्प झाडे, सोनावणे, भुसारी, कपिल शर्मा, श्रीमती. उईके, मेश्राम, मुख्याध्यापक श्री. खेडकर यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. विद्यार्थ्यांनी मेट्रोमध्ये लयबद्ध आदिवासी संगित गायन केले तसेच मुलींनी महिला अधिकाऱ्यांच्या हातावरती धावत्या मेट्रोमध्ये मेहंदी काढली. मेट्रो प्रवासानंतर विद्यार्थ्यांनी रमण विज्ञान केंद्र येथेही भेट दिली. यामध्ये मुलांना वेगवेगळ्या वैज्ञानिक बाबी जवळून पाहता आल्या. यामध्ये थ्रीडी शो मध्ये विद्यार्थ्यांनी थरार अनुभवला.

तर सौर तारामंडलमध्ये खगोलीय माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या बाबींमागील विज्ञान माहिती झाल्यामुळे अभ्यासात गोडी वाढवून त्यांना तर्कशुद्ध विचार करण्यास प्रेरणा मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

या भेटीमध्ये प्रामुख्याने नागपूर मेट्रोचे जनसंपर्क अधिकारी संदीप शेंडे, रमण सायन्सचे पुल्लिंवार यांचे तसेच समर कॅम्पमधील सर्व प्रशिक्षक, प्रोग्रेसिव्ह कला विद्यालय प्रशिक्षक, सर्व मुख्याध्यापक, अधीक्षक, शिक्षक, निलेश राठोड, दिपेश मांडे, हटवार मोहनकर, प्रफुल्ल बडोले आदींचे सहकार्य लाभले. --

# वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या विविध बातम्या

**पुढारी**

## 'न्यूक्लियस बजेट' योजना आता एका क्लिकवर

त्रिपक्षीय सामंजस्य करार : आदिवासी बांधवांना लाभ मिळणे होणार सुकर



My Nashik Edition
May 22, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

राघोजी भांगरे गुणगौरव योजना

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळणार- पालकमंत्री डॉ. उईके

## आदिवासी विकास'चा राज्यात तिसरा क्रमांक

"शासकीय कामात सुसूत्रता आणून लोकाभिमुख कामकाज करण्यासाठी शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम मार्गदर्शक ठरेल. या पुढेही शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. या योजनेचा लाभ सुलभतेने सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यात येईल."
- लीना बनसोड, आयुक्त, आदिवासी विकास विभाग

**दैनिक लोकनामा**

## पेसा कायदा अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रशिक्षण

मंत्री डॉ. उईके : ५ टक्के थेट निधीबाबत आढावा

**पुण्यनगरी**

## आदिवासी विकास'च्या शिरपेचात मानाचा तुरा!

१०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत राज्यात तृतीय क्रमांक



### थोडक्यात हुकले दुसरे स्थान

## धरती आबा जनभागीदारी अभियानास प्रारंभ

प्रचार रथाला मंत्री ऊईके यांनी दाखविला हिरवा झेंडा

विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन

## 'आदिवासी विकास'च्या शिरपेचात मानाचा तुरा

शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत राज्यात तिसरा क्रमांक

०.२९ गुणांनी हुकले दुसरे स्थान

**प्रहार**

## आदिवासी विद्यार्थ्यांचे हेल्थकार्ड तयार होणार

लीना बनसोड : शासकीय आश्रमशाळा आरोग्यसेविका प्रशिक्षण



### अद्ययावत मेडिकल किट मिळणार

**सकाळ**

## निकालात 'एकलव्य'चे विद्यार्थी चमकले

बारावीच्या आठ, तर दहावीच्या पाच शाळांचा १०० टक्के निकाल

## भाग राज्यात तिसरा

०.२९ गुणांनी हुकले दुसरे स्थान

१०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी

सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन

**पुण्यनगरी**

## गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

राघोजी भांगरे गुणगौरव योजना : १० वी, १२ वीच्या यशवंतांचा समावेश

**पुण्यनगरी**

## आदिवासी विकासतर्फे छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

## उन्हाळी शिबिरात चमकले आश्रमशाळांचे विद्यार्थी

**दिव्य मराठी** नाशिक सिटी 17-05-2025

## सीबीएसइ : 'एकलव्य'चा १२ वीच्या ८ तर १० वीच्या ५ स्कूलचा १००% निकाल

प्रतिनिधी | नाशिक

### या शाळांचा १०० टक्के निकाल

इयत्ता दहावी : मवेशी, बोरगाव बाजार, चणकापूर, शिंदे दिगर, सवणे

इयत्ता बारावी : नंदुरबार, मवेशी, अजमीर सौंदाणे, चिखलदरा, बोरगाव बाजार, खैरी परसोडा, सहस्त्रकुंड, शेंडेगाव

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात ...

एकलव्य शाळेतील विज्ञान शाखेचे ५६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ५१७ विद्यार्थी पास झाले आहेत. वाणिज्य शाखेतून १५ विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षेला हजेरी लावली होती. त्यात १० विद्यार्थ्यांना यश मिळाले.

राज्यात इयत्ता बारावीच्या विज्ञान शाखेतून मुलींमध्ये पूजा जाधव हिने ८८.८ टक्के गुणांसह तर मुलांमधून गणेश पारधी याने ८५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकविला. वाणिज्य शाखेत मुलांमध्ये रितेश भांबरे (७५.४%) याला तर मुलींमध्ये दुर्गा महाले (६७.२%) हिला प्रथम क्रमांक मिळाला. इयत्ता दहावीत मुलींमध्ये योगिनी पाडवी ८६.६ टक्के गुणांसह तर मुलांमध्ये आकाश निमाला ८८.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांकाने ...

**दिव्य मराठी** नाशिक सिटी 24-05-2025

## दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

मुख्याध्यापक, शिक्षकांचाही सन्मान

**लोकमत**

**महाराष्ट्र टाइम्स**

### एकलव्य स्कूलचे विद्यार्थी चमकले

## आयआयटीमध्ये विद्यार्थिनींकडून तंत्रज्ञानाचा अभ्यास, संवाद सत्र

'वायएसई' उपक्रमात एकलव्य स्कूलचा ...



### प्रात्यक्षिकांचे सत्र

**आपलं महानगर** www.mymahanagar.com

## १५ जूनपासून 'प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान'

## ६५४ गावांमध्ये विशेष जनजागृती मोहीम

नागरिकांना खालील सेवा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत:

- आधार कार्ड आणि आयुष्मान भारत कार्ड नोंदणी
- जात प्रमाणपत्र व इतर शासकीय दस्तऐवज तयार करणे
- पीएम किसान योजना व जनधन खाते उघडणी
- ई-सेवा सुविधा
- सिकलसेल आजाराबाबत जनजागृती

तालुकानिहाय गावांची संख्या पुढीलप्रमाणे:

## आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे कलाकौशल्य पाहून अपर आयुक्त देखील भारावल्या

मेट्रोमध्ये विद्यार्थ्यांचे चित्र प्रदर्शन : आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचा उपक्रम



**लोकमत**

## १३६ शासकीय, १०४ अनुदानित आश्रमशाळांचा १०० टक्के निकाल

बारावीच्या निकालात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक लोकनामा**

» महत्त्वाचे

### 'आदिवासी विकास'मध्ये महाराष्ट्र दिन

**पुण्यनगरी**

## २४० आश्रमशाळांचा निकाल १०० टक्के!

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे १२ वी परीक्षेत घवघवीत यश

**लोकसत्ता** मुंबई, गुरुवार, २२ मे २०२५ WWW.LOKSATTA.COM

## क्लियस बजेट योजनेची आता प्रभावशील अंमलबजावणी

मस्ट READ

## आदिवासी विद्यार्थ्यांना ५ ते ३० हजारांचा पुरस्कार

### असे आहे राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरूप



"अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांना गुणवत्तेबाबत आवड निर्माण करणे हा योजनेचा हेतू आहे. दहावी व १२ वीत विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा प्रकल्प कार्यालय, अपर आयुक्त, राज्यस्तरावर रोख पारितोषिक दिले जाईल. १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकांचाही सन्मान करण्यात येईल."
डॉ. अशोक उईके, आदिवासी विकासमंत्री तथा पालकमंत्री

## for meritorious ST students

... Development has introduced ...ngre Gungaurav ...urage ST students, ...ieved special mer... 10 and 12 exami... students will be ... the Project Office, ...mmissioner and at ... They will be giv... ranging from Rs 5,000 to Rs 30,000, stated in a press release issued by the DIO.

The top 5 boys and girls in the State will be honoured. A grant of Rs 1,000 per month will be given to 24 meritorious students from each of the 9 divisional boards of the State for 10 months. The top 3 boys and girls from Government and aided ashram schools at the additional commissioner and project level will be honoured. Ashram schools that have achieved 100 percent results will also be honoured.

The Tribal Development Department has been runing government and aided ashram schools, reputed schools, military schools, and Ekalavya Model Residential Schools for Scheduled Tribe students in the state. Some of these schools are affiliated to the State Board of Education and some are affiliated to the Central Board of Secondary Education.

**पुण्यनगरी**

## गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

राघोजी भांगरे गुणगौरव योजना : १० वी, १२ वीच्या यशवंतांचा समावेश

Nashik Edition
May 24, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com